सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १८/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दि.१३/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०५ : ४५ वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०५/०३/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका हद्दतीमधील शहर सांगली येथील जुना भूमापन क्र.३९७/१+२ याचा नवीन भूमापन क.९४/अ/अ यामध्ये उपयुक्त नसलेले अत्यंत खर्चिक आरक्षण क्र.१७८ सिटी पार्क पैकी (एकूण आरक्षण क्षेत्र २७६८०० चौमी.) १७५१५ चौ.मी. पैकी आमचे एकूण क्षेत्र ५९१० चौ.मी. (डीपी रस्ता २१५ चौ.मी. + सिटीपार्क ५६९५ चौ.मी.) निव्वळ ५६९५ चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस नुसार भूसंपादनास मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग सांगली) यांचे दि.०६/०३/२०२४ चे विषयपत्र.**

३. महानगरपालिका हद्दतीमधील शहर सांगली येथील (स.नं.४४१/१) विस्ता. सिसनं.१२१५३ क्षेत्र ४८७.२० चौ.मी. व सिसनं.१२१५४ क्षेत्र ४५७.२० चौ.मी. बहुतांशी बांधकामे असलेले आरक्षण क्र.१४२, गार्डन क्षेत्र ११८००.०० चौ.मी. यापैकी आमचे अशिलांचे एकूण क्षेत्र ९४४.४० चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस नुसार भूसंपादनास मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग सांगली) यांचे दि.०६/०३/२०२४ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम राडारोडा विल्हेवाट लावण्याचा समडोळी रोड कचरा डेपोमध्ये प्रकल्प उभारणीस व बांधकाम राडारोडा विल्हेवाट लावण्याचा सविस्तर प्रकल्प (DPR) अहवालास तांत्रिक मान्यता मिळणेकामी १% प्रमाणे फी आदा करणेस व सी.स.न.२०७ समडोळी रोड कचरा डोपो जागेवर प्रकल्प उभारणेस व याकामी होणाऱ्या खर्चस मान्यता देणेकामी **उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन कक्ष आरोग्य विभाग) यांचे दि.११/०३/२०२४ चे विषयपत्र.**

...२...

५. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०५ कामांचा र.रु.१,६५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्र.**

६. सन २०२३-२४ अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मिरज शहरातील इदगाह माळ परिसर सुधारणा करणे र.रु.२५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्र.**

७. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांचे ट्रान्सफॉर्मरला लागणाऱ्या आगी विजवीण्यासाठी बिलाची आकारणी करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्र.**

८. प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत घटक क्रमांक ०४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थीद्वारे वैयक्ती स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) या घटकातील मंजुर १२० लाभार्थ्यांपैकी ४९ लाभार्थी कर्टलमेंट करुन सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (पी.एम.ए.वाय. विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिकेच्या मक्तेदार नोंदणीसाठी देण्यात आलेली मुदत संपत असलेने पुढील पाच वर्षांसाठी नव्याने नोंदणीसाठी मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्र.**

१०. कुपवाड नवीन स.नं.१७५ (जुना स.नं.२२३) या मंजुर रेखांकनातील ३०.० मी., १८.० मी. व ४५.७२ मी. डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई बाबत. **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्र.**

११. महानगरपालिकेच्या जन्ममृत्यु व अग्निशमन विभागाकडील फी/शुल्क च्या दरामध्ये सुधारणा करण्याबाबत मान्यता देणेकामी **उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४ दिनांक :- १३/०३/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१८ दि.१३/०३/२०२४ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे सायंकाळी ०५:४५ वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.चंद्रकांत खोसे – अतिरिक्त आयुक्त,सांगली
३.	श्री.राहुल रोकडे - उपायुक्त,सांगली	४.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन
५.	श्री.पंडीत पाटील – उपायुक्त मालमत्ता कर व इतर	६.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
७.	श्री.मेंघडे – मुख्य लेखाधिकारी	८.	श्री.रविंद्र ताटे - वैद्यकिय आरोग्याधिकारी (आरोग्य)
९.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	१०.	श्री.अशोक मानकापुरे – प्रशासकीय अधिकारी,सांगली
११.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी	१२.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स. क्र.१
१३.	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३	१४.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
१५.	श्री.परमेश्वर हलकुडे – नगर अभियंता सांगली.	१६.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
१७.	श्री. पा.पु.अभियंता,मिरज	१८.	श्री. अमरसिंह चव्हाण – विद्युत अभियंता
१९.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक	२०.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर
२१.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२२.	श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजिनिअर वर्कशॉप मिरज.
२३.	श्री. वैभव वाघमारे - नगररचनाकार,सांगली	२४.	श्री. सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी पा.पु.
२५.	श्री.अमजद जेलर – क्रिडा अधिकारी		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०५/०३/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महानगरपालिका हद्दतीमधील शहर सांगली येथील जुना भूमापन क्र.३९७/१+२ याचा नवीन भूमापन क.९४/अ/अ यामध्ये उपयुक्त नसलेले अत्यंत खर्चिक आरक्षण क्र.१७८ सिटी पार्क पैकी (एकूण आरक्षण क्षेत्र २७६८०० चौमी.) १७५१५ चौ.मी. पैकी आमचे एकूण क्षेत्र ५९१० चौ.मी. (डीपी रस्ता २१५ चौ.मी. + सिटीपार्क ५६९५ चौ.मी.) निव्वळ ५६९५ चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस नुसार भूसंपादनास मान्यता देणे.
नगररचनाकार	सिटीपार्क आरक्षण आहे. ५ कोटी ८६ लक्ष रक्कम होत आहे. सिटी पार्क व गार्डनसाठी भूसंपादन आवश्यक आहे.
प्रशासक	४९ ची नोटीस कधी दिली जाते.
नगररचनाकार	आरक्षण असल्यामुळे ४९ ची नोटीस दिली आहे.
प्रशासक	एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये जागेच्या मोबदल्यात TDR/DR अथवा FSI देणेची तरतुद आहे. त्यानुसार अर्जदार यांना TDR / DR / FSI देऊन अथवा UDCPR नुसार सर्व समावेशक आरक्षण (AR) नुसार आरक्षण विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

विषय क्र.०३	महानगरपालिका हद्दीमधील शहर सांगली येथील (स.नं.४४१/१) सिसनं.१२१५३ क्षेत्र ४८७.२० चौ.मी. व सिसनं.१२१५४ क्षेत्र ४५७.२० चौ.मी. बहुतांशी बांधकामे असलेले आरक्षण क्र.१४२, गार्डन क्षेत्र ११८००.०० चौ.मी. यापैकी आमचे अशिलांचे एकूण क्षेत्र ९४४.४० चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस नुसार भूसंपादनास मान्यता देणे.
नगररचनाकार	MRTP ॲक्ट मधील कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस शासनाला बजावलेली आहे व एक वर्षाच्या आत भूसंपादन करणेचे कळविलेले आहे. गार्डनचे आरक्षण आहे.
प्रशासक	एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये जागेच्या मोबदल्यात TDR/DR अथवा FSI देणेची तरतुद आहे. त्यानुसार अर्जदार यांना TDR / DR / FSI देऊन अथवा UDCPR नुसार सर्व समावेशक आरक्षण (AR) नुसार आरक्षण विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.
विषय क्र.०४	महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम राडारोडा विल्हेवाट लावण्याचा समडोळी रोड कचरा डेपोमध्ये प्रकल्प उभारणीस व बांधकाम राडारोडा विल्हेवाट लावण्याचा सविस्तर प्रकल्प (DPR) अहवालास तांत्रिक मान्यता मिळणेकामी १% प्रमाणे फी आदा करणेस व सी.स.न.२०७ समडोळी रोड कचरा डोपो जागेवर प्रकल्प उभारणेस व याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता देणे.
पर्यावरण अभियंता	C&D वेस्ट बाबत प्रकल्प अहवालात एमजीपी ला फी देणेची आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०५	सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०५ कामांचा र.रु.१,६५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणे.
शहर अभियंता	मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतर्गत ०५ कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेचा आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०६	सन २०२३-२४ अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मिरज शहरातील इदगाह माळ परिसर सुधारणा करणे र.रु.२५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणे.
शहर अभियंता	प्रशासकीय व निधी मंजुरीसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे सादर करणेचा आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०७	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांचे ट्रान्सफॉर्मरला लागणाऱ्या आगी विजवीण्यासाठी बिलाची आकारणी करणेस मान्यता देणे.
अग्निशमन अधिकारी	MSEB ट्रान्सफॉर्मरला वारंवार आगी लागणेचे प्रमाण वाढलेले आहे. आग विझवताना फोम लिक्वीड पावडर आणि फायर इस्टींगव्हीशर वापरावा लागतो याबाबत MSEB ला पत्र व्यवहार केलेला आहे तरीसुद्धा MSEB कडून उपाय योजना केली जात नसल्याने फोम लिक्वीड पावडर आणि फायर इस्टींगव्हीशर वापरल्यास त्याची बाजारभावाप्रमाणे MSEB कडून रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. तसेच दुर्घटना स्थळी जाणे-येणे, पाणी वापर व प्रतिक्षा शुल्क या प्रमाणे बिल आकारणी करणेस मान्यता दयावी.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०८	प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत घटक क्रमांक ०४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थीद्वारे वैयक्ती स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) या घटकातील मंजुर १२० लाभाथ्यांपैकी ४९ लाभार्थी कर्टलमेंट करुन सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजुर

विषय क्र.०९	महानगरपालिकेच्या मक्तेदार नोंदणीसाठी देण्यात आलेली मुदत संपत असलेने पुढील पाच वर्षांसाठी नव्याने नोंदणीसाठी मान्यता देणेकामी
शहर अभियंता	मक्तेदार नोंदणी मुदत संपत आलेने पाच वर्षाकरीता नोंदणीस मान्यता देणेची आहे
प्रशासक	वर्क ऑर्डर घेवूनसुद्धा अद्याप काम सुरु न केलेले तसेच अर्धवट कामे ठेवलेले मक्तेदार यांची त्यांचेकडील प्रलंबित कामे पुर्ण होईपर्यंत नव्याने नोंदणी करणेत येवू नये. तसेच शहर अभियंता यांनी नोंदणी करताना शासन नियमानुसार कागदपत्रांची तपासणी करुन नोंदणी करावी.
विषय क्र.१०	कुपवाड नवीन स.नं.१७५ (जुना स.नं.२२३) या मंजुर रेखांकनातील ३०.० मी., १८.० मी. व ४५.७२ मी. डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई बाबत
नगररचनाकार	कुपवाड मधील डीपी रस्त्याखालील क्षेत्राचे भुसंपादन करणेचे असून संबंधीतानी टीडीआर ऐवजी खाजगी वाटाघाटीने भरपाई मिळणेची मागणी केलेली आहे.
प्रशासक	खाजगी वाटाघाटीने भुसंपादन करावे व त्यामध्ये दोन वर्षाच्या १२% अतिरिक्त घटकाची होणारी रक्कम कमी करुन भुसंपादन करणेस आयुक्त तथा प्रशासक यांना प्राधिकृत करणेत येत आहे.
विषय क्र.११	महानगरपालिकेच्या जन्ममृत्यु व अग्निशमन विभागाकडील फी/शुल्क च्या दरामध्ये सुधारणा करण्याबाबत मान्यता देणे.
मुख्यलेखाधिकारी	जन्म-मृत्यु विभाग व अग्निशमन विभागाकडील दरामध्ये सुधारणा करणेस दर सुधार समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दरवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे.
प्रशासक	पुर्वीचे दर आणि सुधारीत दर याची माहिती दयावी.
मुख्यलेखाधिकारी	सुधारीत दराची माहिती दिली.
प्रशासक	दर सुधार समितीने शिफारस केल्यानुसार सुधारीत दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- १३/०३/२०२४

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९४ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०५/०३/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ९० ते ९३ चे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा विशेष.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९५ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग सांगली) यांचे दि.०६/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका हद्दीतीमधील शहर सांगली येथील जुना भूमापन क्र.३९७/१+२ याचा नवीन भूमापन क.९४/अ/अ यामध्ये उपयुक्त नसलेले अत्यंत खर्चिक असे आरक्षण क्र.१७८ सिटी पार्क पैकी (एकूण आरक्षण क्षेत्र २७६८०० चौमी.) १७५१५ चौ.मी. पैकी आमचे एकूण क्षेत्र ५९१० चौ.मी. (डीपी रस्ता २१५ चौ.मी. + सिटीपार्क ५६९५ चौ.मी.) निव्वळ ५६९५ चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस अर्जदार श्री.गुंडूराव आप्पासाहेब खोत व सौ.संगीता गुंडूराव खोत तर्फे वटमुखत्यार श्री.संम्मेद गुंडूराव खोत यांचे ॲड.श्री.व्ही.पी.पेडणेकर यांनी मा.शासनास बजावलेली आहे. त्यानुसार खरेदी सूचना कायम झालेल्या दिनांकापासून एक वर्षात विषयांकित आरक्षणाखालील क्षेत्र जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सांगली स.नं.३९७/अ/अ जागेतील अर्जदार यांनी खरेदी नोटीस बजावलेल्या सीटी पार्क आरक्षणाचे क्षेत्र ५६९५ चौ.मी. आहे. मा.शासनाच्या सन २०२३-२४ सालातील बाजार मुल्य तक्त्यातील दरानुसार उक्त क्षेत्राचे भूसंपादन कायद्यानुसार सर्वसाधारण मुल्यांकन र.रु.२,७६,७७,७००/- इतके होत असून १००% दिलासा र.रु. २,७६,७७,७००/- व दोन वर्षांसाठी १२% व्याज प्रमाणे होणारी र.रु.३३,२१,३२४/- असे एकूण र.रु.५,८६,७६,७२०/- होत आहे. तथापि, नगररचना विभाग सांगली यांचेकडील विषयपत्र पाहता त्यामध्ये एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीनुसार जागेच्या मोबदल्यात हस्तांतरण विकसन हक्क (TDR) अथवा सर्वसमावेशक आरक्षण (A.R.) बाबत तरतुद आहे. तथापि, त्याऐवजी संदर्भीय पत्रानुसार उक्त अधिनियमाचे कलम ४९ अन्वये व मा.शासनाच्या निर्णयानुसार विषयांकित आरक्षणाखालील क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी खाजगी वाटाघाटीने जागेची खरेदी अथवा जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांना सादर करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तथापि, मा.प्रशासक महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.शासनाकडे दि.२२/०६/२०२३ रोजी उक्त सर्व्हे नंबरमध्ये आरक्षणाबाबत मा.शासनाकडे दाखल कलम ४९ अन्वये खरेदी नोटीसीवर मनपाकडून अहवाल देण्यात आला होता. त्यामध्ये सदर कलम ४९ अन्वये मा.शासनाकडे दिलेली खरेदीची नोटीस फेटाळण्याबाबत कळविले होते. तथापि, मा.शासनाने सदर कलम ४९ ची खरेदी सुचना कायम केलेली आहे. उक्त जागेवरील परिस्थिती पाहता सर्व आरक्षणाचे क्षेत्र एकत्र मिळत नाही व मिळणारे क्षेत्र हे अरुंद स्वरुपात असल्याने त्याचा वापर नियोजनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी होत नाही. त्यामुळे महापालिकेचा हेतू साध्य होत नसल्याने सदर आरक्षणाखालील मिळकत महानगरपालिकेची आर्थिकस्थिती नसल्याने भूसंपादन करणे शक्य होत नाही.

सबब, एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये जागेच्या मोबदल्यात TDR/DR अथवा FSI देणेची तरतुद आहे. त्यानुसार अर्जदार यांना TDR / DR / FSI देऊन अथवा UDCPR नुसार सर्व समावेशक आरक्षण (AR) नुसार आरक्षण विकसीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

स.स.नं.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९६ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग सांगली) यांचे दि.०६/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका हद्दतीमधील शहर सांगली येथील (स.नं.४४१/१) विस्ता. सिसनं.१२१५३ क्षेत्र ४८७.२० चौ.मी. व सिसनं.१२१५४ क्षेत्र ४५७.२० चौ.मी. बहुतांशी बांधकामे असलेले आरक्षण क्र.१४२, गार्डन क्षेत्र ११८००.०० चौ.मी. यापैकी आमचे अशिलांचे एकूण क्षेत्र ९४४.४० चौ.मी. क्षेत्राकरीता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी नोटीस अर्जदार श्री.कैलास राजाराम सुर्यवंशी यांचे व कोटीभास्कर बिल्डर्स तर्फे वटमुखत्यार श्री.संम्मेद गुंडूराव खोत यांनी मा.शासनास बजावलेली आहे. त्यानुसार खरेदी सूचना कायम झालेल्या दिनांकापासून एक वर्षात विषयांकित आरक्षणाखालील क्षेत्र जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सांगली स.नं.४४१/१ चा विस्तारीत सि.स.न.१२१५३ क्षेत्र ४८७.२० चौ.मी व सि.स.नं.१२१५४ चे क्षेत्र ४५७.२० चौ.मी. या जागेतील अर्जदार यांनी खरेदी नोटीस बजावलेल्या गार्डन आरक्षणाचे क्षेत्र ९४४.४० चौ.मी. आहे. मा.शासनाच्या सन २०२३-२४ सालातील बाजार मुल्य तक्त्यातील दरानुसार उक्त क्षेत्राचे भूसंपादन कायद्यानुसार सर्वसाधारण मुल्यांकन पुढील प्रमाणे होत आहे.मुल्यांकन र.रु.९१,७०,१२४/- इतके होत असून १००% दिलासा र.रु. ९१,७०,१२४/- व दोन वर्षांसाठी १२% व्याज प्रमाणे होणारी र.रु.११,००,४१५/- असे एकूण र.रु.१,९४,४०,६४३/- होत आहे. तथापि, नगररचना विभाग सांगली यांचेकडील विषयपत्र पाहता त्यामध्ये एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीनुसार जागेच्या मोबदल्यात हस्तांतरण विकसन हक्क (TDR) अथवा सर्वसमावेशक आरक्षण (A.R.) बाबत तरतुद आहे. तथापि, त्याऐवजी संदर्भीय पत्रानुसार उक्त अधिनियमाचे कलम ४९ अन्वये व मा.शासनाच्या निर्णयानुसार विषयांकित आरक्षणाखालील क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी खाजगी वाटाघाटीने जागेची खरेदी अथवा जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांना सादर करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तथापि, मा.प्रशासक महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.शासनाकडे दि.२२/०६/२०२३ रोजी उक्त सर्व्हे नंबरमध्ये आरक्षणाबाबत मा.शासनाकडे दाखल कलम ४९ अन्वये खरेदी नोटीसीवर मनपाकडून अहवाल देण्यात आला होता. त्यामध्ये सदर कलम ४९ अन्वये मा.शासनाकडे दिलेली खरेदीची नोटीस फेटाळण्याबाबत कळविले होते. तथापि, मा.शासनाने सदर कलम ४९ ची खरेदी सुचना कायम केलेली आहे. उक्त जागेवरील परिस्थिती पाहता सर्व आरक्षणाचे क्षेत्र एकत्र मिळत नाही व मिळणारे क्षेत्र हे अरुंद स्वरुपात असल्याने त्याचा वापर नियोजनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी होत नाही. त्यामुळे महापालिकेचा हेतू साध्य होत नसल्याने सदर आरक्षणाखालील मिळकत महानगरपालिकेची आर्थिकस्थिती नसल्याने भूसंपादन करणे शक्य होत नाही.

सबब, एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) अन्वये जागेच्या मोबदल्यात TDR/DR अथवा FSI देणेची तरतुद आहे. त्यानुसार अर्जदार यांना TDR / DR / FSI देऊन अथवा UDCPR नुसार सर्व समावेशक आरक्षण (AR) नुसार आरक्षण विकसीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

दिनांक :- १३/०३/२०२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८१०

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन कक्ष आरोग्य विभाग) यांचे दि.११/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम राडारोडा (C&D Weast) विल्हेवाट लावण्याचा समडोळी रोड कचरा डेपोमध्ये प्रकल्प उभारणीस व बांधकाम राडारोडा (C&D Weast) विल्हेवाट लावण्याचा सविस्तर प्रकल्प (DPR) अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता मिळणेकामी १% प्रमाणे होणारी फी र.रु.४,९७,७४०/- मात्र आदा करणेस व सी.स.न.२०६ व २०७ या समडोळी रोड कचरा डोपो जागेवर प्रकल्प उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९८ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद मंजूर एकूण ०५ कामांचा र.रु.१,६५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	र.रु.(लक्ष)
१	प्रभाग क्र.१६ मध्ये आर.सी.सी. गटर, सी.सी. रस्ते व लादीकरण व फुटपाथ करणे.	६०.००
२	प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन अंतर्गत गटर, काँक्रीट रस्ते करणे.	४०.००
३	प्रभाग क्र.०४ मध्ये अंतर्गत आर.सी.सी. गटर, रस्ते, लादीकरण व फुटपाथ करणे.	३०.००
४	प्रभाग क्र.०४ मध्ये अकुजनगर कुपवाड येथे मिळकत क्र.२००/२ब नियोजित उद्यानाची उभारणी करणे.	२५.००
५	प्रभाग क्र.०९ मध्ये महानगरपालिका मिळकत सि.स.नं.६७१६/अ/२/१७ मधील क्लासिक पार्क उद्यान विकसित करणे.	१०.००
	एकूण	**१६५.००**

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८९ **दिनांक :-** १३/०३/२०२४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२३-२४ अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मिरज शहरातील इदगाह माळ परिसर सुधारणा करणे र.रु.२५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०० **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.१२/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

MSEDCL च्या ट्रान्सफॉर्मरला वारंवार आमी लागण्याचे प्रमाण वाढलेले असून ट्रान्सफॉर्मची आग विजवीणेची कामगिरी महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत केली जाते. या ट्रान्सफॉर्मर आगीच्या वेळी काही वेळेस परिस्थितीनुरुन फोम लिक्वीड/पावाडर टाईप Fire Extinguisher आग विझवीणेची कामगिरी पारपाडावी लागते. MSEDCL ट्रान्सफॉर्मरला लागलेल्या आगी अग्निशमन दलाकडून मोफत विझवीवण्यात येतात त्यामुळे ट्रान्सफॉर्मरला आगी लागणेची कारणे शोधुन त्याबाबत उपाययोजना करणेबाबत महापालिकेकडून MSEDCL यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि, MSEDCL कडून याबाबतची कोणतीही उपाययोजना अथवा दक्षता घेण्यात आलेली नाही. याबार्बीचा विचार करता तसेच MSEDCL ट्रान्सफॉर्मरला दिवसेंदिवस वारंवार आगी लागण्याचे प्रकारात वाढ झालेली असलेने यापुढे MSEDCL च्या ट्रान्सफॉर्मरची आग विझविण्यासाठी फोम लिक्वीड/पावाडर टाईप Fire Extinguisher वापरल्यास त्याचा बाजारभावा प्रमाणे रक्कम वसुल करणे तसेच दुर्घटना स्थळी जाता येता कि.मी. दरानुसार आकारणी करणे तसेच पाण्याचा वापर झाल्यास त्याचे बिल, त्याचबरोबर अग्निशमन गाडी घटनास्थळी पोहोचल्या नंतर प्रथम एक तास पुर्ण झाले नंतर प्रतिक्षा शुल्क आकारणे अशा पध्दतीने बिलाची आकारणी करुन MSEDCL कडून बिलाची वसुली करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०१ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (पी.एम.ए.वाय. विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत घटक क्रमांक ०४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थीद्वारे वैयक्ती स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) या घटकातील मंजुर १२० लाभार्थ्यांपैकी वेळोवेळी संपर्क साधूनही प्रतिसाद मिळत नसल्याने अशा एकूण ४९ लाभार्थ्यांची नावे रद्द करुन (कर्टलमेंट करुन) सुधारीत एकूण ७१ लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

नगरसचिव (PMAY)

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७०२ दिनांक :- १३/०३/२०२४

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सर्व विकासकामे मक्तेदारांमार्फत करुन घेण्यासाठी महानगरपालिकेचे नोंदणी प्रमाणपत्र दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत तीन वर्षांच्या मुदतीकरिता देण्यात आलेले आहेत. मक्तेदार नोंदणीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वर्ग ४ सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करिता दि.३१/०५/२०१८ नुसार पंजिकरणाची मुदत १० वर्षांकरिता दिली आहे व इतर वर्गांकरिता पंजिकरणाची मुदत ५ वर्षांकरिता दिली आहे तर जनरलवर्गकरिता मुदत ३ वर्षांकरिता नोंदणी दिली जाते. सन २०२१ पुर्वी महानगरपालिकेने नोंदणी प्रमाणपत्र ५ वर्षां मुदतीकरिता दिली होते त्याच प्रमाणे महानगरपालिकेचे नोंदणी प्रमाणपत्र ५ वर्ष मुदतीकरिता दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२९ पर्यंत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तथापि, सदरचे नोंदणीप्रमाणपत्र देताना शासन नियमानुसार सर्व कागदपत्रे तपासून छाननी करुन, सुयोग्य नोंदणी प्रमाणपत्र देणेची जबाबदारी शहर अभियंता यांचेवर राहील. त्याचप्रमाणे ज्या मक्तेदारांनी वर्क ऑर्डर घेवून सुद्धा अद्याप कामे सुरु केलेली नाहीत अथवा पुर्वीची कामे अपुर्ण ठेवलेली आहेत अशा मक्तेदारांची मागील सुरु न केलेली तसेच अपुर्ण ठेवलेली कामे पुर्ण केल्याशिवाय त्यांची नव्याने नोंदणी करु नये असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम महाराष्ट्रशासन यांचेकडील शासन निर्णयानुसार मिरज तालुक्यातील मजुर सहकारी सोसायटी यांना जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांचेकडील प्रमाणपत्रानुसार नोंदणी प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच, शासनाच्या सार्व.बांधकाम विभागाकडील झाले नोंदणीनुसार सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेले नोंदणी फी नुसार वर्ग ४ ते ७ साठी र.रु.३०००/- व वर्ग ९ ते ८ करिता र.रु.२०००/- नोंदणी फी व फॉर्म फी भरुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-१०३ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेच्या कुपवाड येथील नवीन स.नं.१७५ (जुना स.नं.२२३) या मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्ते, डी.पी.रस्ते, खुली जागा याचे क्षेत्र मुळ मालक श्री.दादासो शिवगोंडा पाटील व इतर यांनी दि.२१/०४/२०१२ रोजी त्यामधील डी.पी.रस्त्याखालील क्षेत्राचे नियमानुसार नुकसान भरपाई मिळणेचा हक्क आबाधीत ठेवुन डी.पी. रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात दिलेले होते.

सदर डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्र (१) १८ मीटर रस्त्याखालील क्षेत्र १७३६ चौ.मी., (२) ३०० मीटर डी.पी.रस्त्याखालील क्षेत्र २२५० चौ.मी., (३) ४५.७२ मीटर डी.पी. रस्त्याखालील क्षैत्र ६१६ चौ.मी. असे याप्रमाणे एकूण बाधीत क्षेत्र ४६०२ चौ.मी. होत असुन सदर बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर. ऐवजी खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई घेण्यात तयार असलेचे कळविले आहे.

सदर रेखांकनातून जाणारा ३० मीटर डी.पी. रस्ता हा कुपवाड फाटा ते सुत गिरणी पर्यंत जाणारा असुन त्यामधील स.नं.२११, २१९, २२०, २२१ या जमिनिच्या मिळकत धारकांना नुकसान भरपाई देऊन क्षेत्र ताब्यात घेलेले आहे. त्याच प्रमाणे सदर स.नं.२२३ मध्ये डी.पी. रस्त्यासाठी क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक असुन सदर ३० मीटर डी.पी. रस्त्याच्या सन्मुख प्ले ग्राऊंड, व्हेजीटेबल मार्केट, गार्डन, शॉपिंग सेंटर, महिला वसतीगृह, बस स्टॉप इत्यादी आरक्षणे आहेत. तसेच १८ मीटर रस्त्या सन्मुख प्ले ग्राऊंड, गार्डन, पी.एस., पी.जी. ही आरक्षणे असुन ४५.७२ डी.पी. रस्त्या सन्मुख गार्डन आरक्षण आहे. सदरची आरक्षणे ही गर्दीची व एकाच ठिकाणी असल्याने रस्ता रुंदी ही तेव्हड्याच रुंदीची असणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक रस्ता रुंदीचा निकष न लावता संपुर्ण डी.पी. रस्त्याखालील क्षेत्राचा विचार करणे आवश्यक आहे.

उक्त बाबींचा विचार करता केंद्र शासनाच्या भूमीसंपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई करताना मिळणेचा व पारदर्शता अधिनियम २०१३ नुसार नुकसान भरपाई देणे आवश्यक असुन बाधीत होणाऱ्या क्षेत्र ४६०२ चौ.मी. जागेचा चालु शासकीय मुल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यानुसार र.रु.४२८०/- प्रती चौ.मी. दर आहे. त्यानुसार जमिनिची किंमत मुल्य र.रु.१,९६,९६,५६०/- इतकी होत असुन, जमिनिची किंमत व १००% दिलासा रक्कम व दोन वर्षासाठी प्रतिवर्ष १२% अतिरिक्त घटक यानुसार र.रु.४,४१,२०,२९४/- मात्र होत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र प्रदेशिक नगररचना व नियोजन प्राधिकरण १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार सदर प्रकरणी खाजगी वाटाघाटीने नुकसान भरपाई अंतिम करुन त्यानुसार सदर बाधीत क्षेत्राचे दोन वर्षासाठी १२% अतिरिक्त घटकची होणारी र.रु.४७,२७,१७४/- मात्र रक्कम कमी करुन र.रु.३,९३,९३,१२०/- मात्र रक्कमेस बाधीत क्षेत्राचे भूसंपादन करणेस ही सभा आयुक्त तथा प्रशासक यांना प्राधिकृत करित आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १८/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १०४ **दिनांक :- १३/०३/२०२४**

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.१३/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले **महाराष्ट्र** महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार **महाराष्ट्र शासन नगरविकास** विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.३५ दि.१९/०५/२०१६, मा.महासभा ठराव क्र.१३६ दि.२०/१२/२०१९ व मा.महासभा ठराव क्र.२४८ दि.२०/१२/२०२३ अन्वये जन्ममृत्यु व अग्निशमन विभागाकडील फी/शुल्क च्या दरामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या होत्या. सदरच्या शुल्क फीमध्ये वाढ करणे आवश्यक असल्याने दि.१३/०३/२०२४ रोजी झालेल्या दर सुधार समितीच्या बैठकीत जन्म मृत्यु व अग्निशमन विभागाकडील सुधारीत दर लागु करणेस मान्यता देणेत आलेली होती. त्यानुसार खालील प्रमाणे सुधारीत दर लागु करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुधारीत दर
परिशिष्ट 'ड'

अ.क्र.	पुरविण्यात येणारी सेवा	सुधारीत दर	
१.	अग्निशमन वाहनाने आग विजविणे	*अ) स्थानिक मोफत, तथापी* (i) फोम, Fire Extinguisher ने आग विजविल्यास त्याचे चालू बाजार दराने रक्कम वसूल करावी. (ii) मनपा हद्दीबाहेर रु.५०/- प्रती कि.मी. परतीच्या प्रवासासहित + गाडी घटनास्थळी पोहचल्यानंतर पहिल्या तासानंतर प्रतिक्षा शुल्क रु.७००/- प्रतीतास + पाण्याचा वापर झाल्यास १ खेप पाण्याचे रु. १०००/-	
२.	अग्निशमन गाडीसह बंदोबस्त ड्युटी	अ) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अधिकृत दौरा प्राप्त झाल्यास शासकीय कार्यक्रमासाठी VIP आले असल्यास मनपा क्षेत्र व क्षेत्राबाहेर मोफत. ब) खाजगी कार्यक्रमासाठी VIP आले असल्यास संयोजकांकडून रु.५०/- प्रती कि.मी परतीच्या प्रवासासहित + गाडी कार्यक्रमस्थळी - पोहोचल्यानंतर प्रतिक्षा शुल्क रु.७००/- प्रतीतास + पाण्याचा वापर झाल्यास १ खेप पाण्याचे रु. १०००/-	
३.	आग विजविलेचा दाखला देणे	अ) (i) हद्दीत निवासी रुपये ५००/- (ii) कमर्शियल रुपये १०००/-	ब) (i) हद्दीबाहेर निवासी रुपये ५००/- (ii) कमर्शियल रुपये २०००/-
४.	अ) तात्पुरती आग संरक्षक मान्यता (Provisional Fire Safety Approval) ब) अंतिम आग संरक्षक मान्यता (Final Fire Safety Approval) **(सां.मि.कु. शहर महानगरपालिका क्षेत्र मर्यादीत)**	अ) तात्पुरती आग संरक्षक मान्यता (i) निवासी २५००/- (ii) व्यवसायिक ४०००/- ब) अंतिम आग संरक्षक मान्यता (i) निवासी २५००/- (ii) व्यवसायिक ४०००/-	

५.	सर्कस,प्रदर्शन,यात्रा/जत्रा,सांस्कृतिक, मनोरंजन / फेस्टीव्हल/ पाळणे इत्यादी अन्य सर्व प्रकारचे व्यवसायिक कार्यक्रम यांना मागणीनुसार अग्निशमन तात्पुरते ना-हरकत दाखले / परवानगी फी. **(अग्निशमन तात्पुरते ना-हरकत दाखले / परवानगी सां.मि.कु. शहर महानगरपालिका क्षेत्र मर्यादीत)**	प्रतीदिवस १०००/- **(मनपा क्षेत्रात व क्षेत्राबाहेर अग्निशमन वाहन पुरविण्यास अ.क्र. २ मधील 'ब' प्रमाणे बील वसुल करावे.)**
६.	बोट स्पर्धेवेळी अग्निशमन विभागाची बोट पुरविणे	संबंधितांनी रक्कम रु.२०००/- अग्निशमन विभागाकडे रोखीने भरावी व बोट व अनुषंगिक साहित्य सुरक्षित ने-आण करण्याची जबाबदारी संयोजक / आयोजकांवर राहील.
७.	फटाके विक्री स्टॉल अग्निशमन तात्पुरता नाहरकत दाखला फी. **(दिपावली व इतर सणानिमित्त तात्पुरते फटाके स्टॉल)**	रुपये २०००/- प्रतीस्टॉल.
८.	"अंतिम आग संरक्षक मान्यता" वार्षिक नुतणीकरण (आवश्यकतेनुसार)	सर्व प्रकारचे आस्थापना रुपये ४०००/-
९.	शासकीय / निमशासकीय / इतर विभागाने आग सुरक्षाकामी अग्निशमन गाडीची मागणी केलेस	**मनपा क्षेत्रात व क्षेत्राबाहेर** रु.५०/- प्रती कि.मी परतीच्या प्रवासासहित + गाडी कार्यक्रमस्थळी - पोहोचल्यानंतर प्रतिक्षा शुल्क रु.७००/- प्रती तास + पाण्याचा वापर झाल्यास १ खेप पाण्याचे रु.१०००/-

जन्म मृत्यु विभाग

पुरविणेत येणा-या सेवा	सुधारीत दर
जन्म मृत्यु दाखला, जन्म मृत्यु प्रमाणपत्र (२१ दिवसाचे आतील नोंदी)	जन्म व मृत्यु दाखला प्रती प्रत रु १०/-
मुलीचा जन्म दाखला	१ वर्षापर्यत मोफत
शोधणावळी फी	१ वर्षापर्यत मोफत व त्यापुढील दर महिन्यासाठी रु १०/-
बाळाचे नांव नोदणी	१ वर्षापर्यत मोफत त्यापुढील प्रतीवर्ष रु १०/-
१ वर्ष पुढील जन्म मृत्यु नोंदणीकामी (कोर्ट आदेश)	१ वर्षापर्यत रु १०/- त्यापुढील प्रतीवर्ष रु ५०/-
जन्म अहवाल नमुना क्रं १	रु १०/- प्रतीफॉर्म
मृत्यु अहवाल नमुना क्रं ३,४,४ अ	रु १०/- प्रतीफॉर्म
नोंद नसलेबाबतचे प्रमाणपत्र	रु २०/-
जन्म मृत्यु नोंद दुरुस्ती / नोंदणी मधील	रु २५/-

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका